आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८,क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११००१
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४

जा.क्र./आसंप्रसं/२०२६/स्प.प./साचाप२६/का.०४/५०२३ दि.०८/१०/२०२६

**<u>प्रसिद्धीपत्रक</u>**

**सन २०२६-२७ करीता टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत व आर्टी या स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी घेण्यात आलेल्या सामायिक चाळणी परीक्षा (CET) संदर्भात Response Sheet व Challenge Portal उपलब्ध करून देणेबाबत..**

महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणानुसार सन २०२६-२७ करीता टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांकरीता लाभार्थी निवडीकरीता दि. १८ सप्टेंबर, २०२६ ते दि. ३० सप्टेंबर, २०२६ या कालावधीत ऑनलाईन सामायिक चाळणी परीक्षा (CET) घेण्यात आल्या होत्या. सदरच्या सामायिक चाळणी परीक्षांच्या (CET) संदर्भात उपस्थित राहिलेल्या सर्व उमेदवारांकरीता परिक्षेतील प्रश्न आणि/किंवा उत्तरे ई. बाबत काही आक्षेप असल्यास ते नोंदविण्याकरीता **Challenge Portal** उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर पोर्टल **दि. ०८ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपासून दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत** उपलब्ध करून देण्यात येत आहे. तद्नंतर सदर पोर्टल बंद करण्यात येईल. त्यामुळे Response sheet पाहण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवारांची राहील.

तसेच Challenge Portal व Response sheet करीता टीआरटीआय, बार्टी, सारथी, आर्टी आणि अमृत या संस्थांचा ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या URL लिंकला Login करून आपला ई-मेल आयडी व PASSWORD (ऑनलाईन फॉर्म भरताना जो Username व Password वापरला आहे तो) बाबत योग्य ती माहिती नोंदवून आपले आक्षेप नोंदवू शकतात.

तरी सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपली प्रश्नपत्रिका, आपण दिलेली उत्तरे व बरोबर उत्तरे पाहण्यासाठी तसेच काही प्रश्नांबाबत आक्षेप असल्यास ते नोंदविण्यासाठी सदर पोर्टलचा वापर करावा.

**स्वा/-**
(निलेश सागर, भा.प्र.से.)
**अध्यक्ष, स्प. प. प्र. अं व स. समिती तथा**
**आयुक्त, आसंप्रसं, पुणे**



Scanned with OKEN Scanner